दिनांक ०८.०१.२०२६.

**प्रेस नोट**

लोकसेवक चक्रधर पंडितराव कदम, वय ३९ वर्षे, पद लिपीक/टंकलेखक, गट क, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय कळमनुरी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली यांनी ३,०००/– रूपये लाचेची मागणी करून दिनांक ०८.०१.२०२६ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान ३,०००/– रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन कळमनुरी, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

दिनांक ०९.१२.२०२५ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार व त्यांचा भाऊ यांनी दिनांक १८.०९.२०२२ रोजी त्यांचे कुटुंबीयांचे सदस्यांची नावे शिधापत्रिकेमध्ये समाविष्ट करून बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरीता तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे अर्ज दाखल केला होता. त्यावरून तक्रारदार व त्यांच्या भावाला शिधापत्रीका मिळाली आहे. परंतु सद्या तक्रारदार व त्यांच्या भावाला शिधापत्रीकेवर स्वस्त धान्य मिळत नाही. याबाबत तक्रारदार व त्यांचे भावाने बी.पी.एल. योजना अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरीता तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे वेळोवेळी अर्ज सादर केलेले आहेत. परंतु अद्याप पावेतो त्यांना लाभ न मिळाल्याने, तक्रारदार व त्यांच्या भावाने दिनांक ०६.१०.२०२५ रोजी तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे प्राधान्य कुटुंब योजना (पी.एच.एच.) मध्ये समाविष्ट करून स्वस्त धान्य मिळवून देणेबाबत परत अर्ज केला आहे.

दिनांक ०८.१२.२०२५ रोजी तक्रारदार त्यांचे कामाचे अनुषंगाने पुरवठा विभागातील क्लर्क श्री कदम यांना जाऊन भेटले. तेव्हा तक्रारदार व त्यांच्या भावाचे बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याच्या योजनेमध्ये नाव समाविष्ट करून लाभ मिळण्याचा अंतिम आदेश काढुन देण्यासाठी कदम क्लर्क पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय कळमनुरी यांनी तक्रारदार व त्यांच्या भावाचे प्रत्येकी ४,०००/– रूपये असे दोघांचे मिळुन ८,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार प्राप्त झाली.

दिनांक ०९.१२.२०२५ रोजी यातील आरोपी लोकसेवक चक्रधर कदम, लिपीक/टंकलेखक, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कळमनुरी यांची पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली. पडताळणी दरम्यान तक्रारदार व त्यांच्या भावाचे बी.पी.एल. योजनेअंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याच्या योजनेमध्ये नाव समाविष्ट करून अन्नधान्य मिळणेबाबतचा अंतिम आदेश काढुन देण्यासाठी एका फाईलचे प्रत्येकी १,५००/– रूपये प्रमाणे दोन फाईलचे ३,०००/– रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वत: स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी आरोपी लोकसेवक चक्रधर कदम, लिपीक/टंकलेखक यांनी आज दिनांक ०८.०१.२०२६ रोजी पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कळमनुरी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली येथे त्यांचे चेंबरमध्ये तक्रारदार यांना लाचेची ३,०००/– रूपये रक्कम त्यांचे टेबलचे ड्रावरमध्ये टाकण्यास सांगून लाच रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचे विरूद्ध पो.स्टे. कळमनुरी, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी पोह/भगवान मंडलीक, गजानन पवार, पो.शि./शिवाजी वाघ, अमोल जाधव, चापोह/अकबर शेख, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.

श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२

टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५.

व्हॉटसअॅप क्रमांक :– ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

(राजेश मलपिलु)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.